किरकोळ वारस अर्ज नं. ०१/२०१८
श्रीमती पार्वता वगैरे –वि–निरंक

# आदेश नि.क्र. १

(दि. २३ माहे फेब्रुवारी, सन २०१८ रोजी पारीत)

१. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला.

२. अर्जदारांनी अर्जात नमूद केल्यानुसार अर्जदार क्र. १ ही मृतक शंकर बुधाजी दोडके यांची पत्नी तर अर्जदार क्र. २ ते ४ या मुली आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ तर्फे अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे पुराव्या दाखल शपथपत्र नि.क्र. १० अभिलेखावर दाखल केले. अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या शपथपत्रात नमुद केले की, अर्जदार क्र. १ चे पती शंकर बुधाजी दोडके यांचे दि.३१.०५.२०१७ रोजी निधन झाले. अर्जदारांना मृतक शंकर बुधाजी दोडके यांचे वारसान प्रमाणपत्राची मृतकाचे नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेत वारस म्हणून नाव दर्ज करण्याकरीता आवश्यकता आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मृतक शंकर बुधाजी दोडके यांचे इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार क्र. १ ते ४ हे मृतक शंकर बुधाजी दोडके यांचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. अर्जदारांनी त्यांचे कथनाचे समर्थनार्थ मृतक शंकर बुधाजी दोडके यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत नि.क्र.१३, मृतकाचे आधार कॉर्डची प्रत नि.क्र.१४, अर्जदार क्र. १ ते ४ चे आधार ओळखपत्राची प्रत अनुक्रमे नि.क्र.१५ ते १७, अर्जदाराचे राशन कॉर्डची प्रत नि.क्र. १८, नगर सेवकाने दिलेले वारसान प्रमाणपत्र् नि.क्र. १९ इत्यादी दस्ताऐवजांच्या पडताळलेल्या प्रती अभिलेखावर दाखल केलेले आहे.

३. सदर प्रकरणामध्ये दि.१५.०१.२०१८ रोजी नि.क्र.७ नुसार जाहिरनामा नगर परिषद, नागभीड येथील नोटीस बोर्डवर तसेच अर्जदारांचे घराचे दर्शनी भागावर लावून

एक महिण्याचे आत हरकती मागविण्यात आल्या. तसेच दैनिक पुण्यनगरी या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा—या वर्तमानपत्रामध्ये दि.११.०१.२०१८ रोजी जाहीर प्रगटन नि.क्र. १२ प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्जदारांचा अर्ज मान्य करण्यात येते.

२. अर्जदार क्र.१ श्रीमती पार्वता शंकर दोडके, रा. नागभीड, ता. नागभीड, जिल्हा चंद्रपूर, अर्जदार क्र. २ रेखा पंढरी राणे, रा. मुधोली, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर, अर्जदार क्र.३ मिना नवनाथ जांभुळे, रा. नवखळा, ता. नागभीड, जिल्हा चंद्रपूर व अर्जदार क्र. ४ प्रतिभा राजकुमार चौधरी, रा. परसोडी, ता. साकोली, जिल्हा भंडारा हे मृतक शंकर बुधाजी दोडके यांचे वारस आहेत.

३. अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

(के.एस. खंडारे)

दि. २३.०२.२०१८ दिवाणी न्यायाधीश (क.स्त.)

नागभीड